## STUDENT ACHIEVMENTS:

Pavan Shinde student of MIDSR Dental College,Latur got first prize in blog benchers award in 2016 felicitated by Principal,Dr.SureshKamble sir and Principal of MIMSR Medical College Dr.SaritaMantri mam.



# मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी पुढाकार

### ब्लॉग बेंचर्स विजेता पवन शिंदे पुरस्काराची रक्कम तांत्रिक उपकरणांसाठी खर्च करणार

पवन शिंदे याला प्रमाणपत्र व धनादेश देताना महाविद्यालयाच्या डीन डॉ. सरिता मंत्री, प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे, पवन शिंदेचे आई–वडील आदी.

वार्ताहर, लातूर

मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी ब्लॉगबेंचर्स विजेता सरसावणार असून, मराठवाड्याचे विद्यार्थी नेमके कुठे मागे पडतात, यासाठी जमेल तसे मार्गदर्शन करणार आहे. त्यासाठी तांत्रिक उपकरणे घेण्यासाठी पारितोषिकाची रक्कम आपण खर्च करणार असल्याचे ब्लॉग बेंचर्स विजेता पवन शिंदे याने सांगितले.

'लोकसत्ता'च्या ब्लॉग बेंचर्स स्पर्धेत 'देव पहावा कारणे' अग्रलेखावर या महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या पवन रवींद्र शिंदे याने प्रथम पारितोषिक पटकावले.

आमच्या कुटुंबात अनेक पिढ्यांमध्ये फारसे कोणी शिकले नव्हते. इयत्ता नववीत असताना वीणा गवाणकर यांचे 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक वाचायला मिळाले. अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचले पाहिजे, अशी गोडी निर्माण झाली. त्यानंतर वाचत गेलो. 'लोकसत्ता' केवळ गुणवत्तेला प्राधान्य देतो; विद्यार्थी कोणत्या गावातील आहे याला नाही, हे लक्षात आले, असे त्याने सांगितले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही त्यांना व्यक्त होण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे असे विद्यार्थी प्रकाशात येत नाहीत. 'लोकसत्ता'ने अग्रलेखावर व्यक्त होण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले आणि दंत महाविद्यालयातील आमचा विद्यार्थी राज्यात पहिला आला. 'लोकसत्ता'ने ही संधी दिल्यामुळेच हे घडले असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे यांनी व्यक्त केले.

## उपक्रमामुळे जिंकण्याची ऊर्मी

### उपविजेत्या काजल बोरस्तेची भावना

लोकसत्ता ब्लॉग बेंचर्स

प्राचार्य व्ही. एन. सूर्यवंशी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना काजल.

प्रतिनिधी, नाशिक

**'लोकसत्ता'चे उपक्रम** हे नेहमीच नावीन्यपूर्ण असतात. यामुळे स्पर्धेत उतरण्याची तसेच जिंकण्याची ऊर्मी आपसूक मिळते, अशी भावना 'लोकसत्ता ब्लॉग बेंचर्स' उपविजेती काजल बोरस्ते हिने मांडली.

येथील हं. प्रा. ठा. महाविद्यालयातील वृत्तपत्र विद्या विभागाची विद्यार्थिनी काजलने लोकसत्ता ब्लॉग बेंचर्स स्पर्धेत 'देव पाहाया कारणे' या संपादकीयवर मत व्यक्त केले. स्पर्धेत तिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. सोमवारी प्राचार्य व्ही. एन. सूर्यवंशी यांच्या हस्ते तिला सन्मानित करण्यात आले. पाच हजार रुपये रोख व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी काजलने लोकसत्त नेहमी सृजनतेला वाव देणारे उपक्रम आयोजित करत असल्याचे नमु केले. लोकांकिका स्पर्धा असो व वक्तृत्व स्पर्धा, या स्पर्धांमध्ये आपल सहभाग राहिला असून वक्तृत्व राज्य पातळीवर मी विजेती आ त्यावेळी बोलणे आणि बोलता येणे फरक त्या त्या दिग्गज मंडळीम स्पर्धेच्या निमित्ताने अनुभवता आ ब्लॉग बेंचर्समुळेही हेच घडले, ती म्हणाली. सूर्यवंशी यांनीही उपक्रमांचे कौतुक केले.




Pavan shinde got first prize in blog benchers award.

लोकसत्ता

२ WWW.LOKSATTA.COM
गुरुवार, २१ एप्रिल २०१६

केजी टू कॉलेज


## पवन शिंदे, काजल बोरास्ते 'ब्लॉग बेंचर्स'चे मानकरी

खास प्रतिनिधी, मुंबई


पवन शिंदे


काजल बोरास्ते

**'देव पहाया करणे'** या 'लोकसत्ता'तील अग्रलेखावर आपले मत मांडणारा लातुरच्या 'एमआयडीएसआर दंत महाविद्यालया'चा पवन शिंदे 'ब्लॉग बेंचर्स' स्पर्धेच्या पहिल्या क्रमांकाच्या बक्षीसाचा मानकरी ठरला आहे. तर नाशिकच्या 'एच.पी.टी. आर्ट्स अ‍ॅण्ड आर. वाय. के. सायन्स कॉलेज'ची काजल बोरास्ते हिने दुसरं पारितोषिक पटकावले आहे.

महिलांच्या मंदिर प्रवेशावरून सुरू असलेल्या वादावर भाष्य करणारा हा अग्रलेख १४ एप्रिलला प्रकाशित झाला होता. त्यावर पवन आणि काजल हिने केलेले भाष्य परीक्षकांना विशेष भावले. पवनला सात हजार आणि प्रमाणपत्र तर काजलला पाच हजार आणि प्रमाणपत्र असे बक्षीस देण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या हस्ते गौरविण्यात येईल.

लोकसत्ता ब्लॉग बेंचर्स

महाविद्यालयीन युवा शक्तीच्या लेखणीला व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी प्रत्येकवेळी भरभरून प्रतिसाद देत आपला सहभाग 'ब्लॉग'द्वारे नोंदविला आहे. यात प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवारी 'आठवड्याचे संपादकीय' या शीर्षकाखाली नवीन लेख प्रसिद्ध करण्यात येतो. त्यावर विद्यार्थ्यांना व्यक्त व्हायचे असते. त्यांना पुढील आठवड्याच्या गुरुवारपर्यंतची मुदत दिली जाते. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या लेखांचे परीक्षक तज्ज्ञ परीक्षकांकडून केले जाते. त्यानंतर पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाची बक्षीसे काढली जातात. पहिल्याच लेखापासून या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. तसेच, विद्यापीठांचे व प्राचार्यांचे मोलाचे सहकार्य स्पर्धेला दिले आहे. विजेत्या विद्यार्थ्यांचे लेख 'लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध केले जातात. 'लोकसत्ता'च्या राज्यभरातील वाचकांना या निमित्ताने तरूणाईचे अंतरंग समजून घेण्याची संधी मिळते.

First Prize Winning Blog of Pavan Ravindra Shinde (DAINIK LOKSATTA)

जेव्हा एखाद्या गोष्टीमुळे कोणाचातरी श्वास गुदमरतो, स्वतःवर होणार्या भेदभावाची जाणीव होते, चालत आलेल्या चुकीच्या परंपरा आणि नव्या विश्वात प्रवेश करण्यास मदत करणारे आधुनिक विचार यांचे डोक्यामध्ये घनघोर युध्द सुरु होते, मग त्या व्यक्तीला अनेक प्रश्न पडतात आणि त्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याकरिता त्या व्यक्तीच्या वैचारिक ठिणगीचा वानवा होतो आणि त्या वणव्यामध्ये जाचक, अन्यायकारक, अनिष्ट रूढीपरंपरा जाळून खाक होतात. काही दशकांपूर्वीची महिला परंपरा मान्य करायची कारण तिला सांगितलेलं असायचं कि तू एक स्त्री आहे आणि तुला हे पाळाव लागेल. पण आज तीच महिला जेव्हा गैरपरंपरांच्या कृष्णाविवरला भेदून काढत, हि परंपरा कायमची मोडीत काढण्याचा पवित्र घेऊन उभी आहे तर आपण आशा महिलांचा आणि या विचारांचा आदरसन्मानाच करायला हवा. पाणीटंचाई, दुष्काळ, भ्रष्टाचार या आजच्या प्राधान्यक्रमात नक्कीच वरच्या समस्या असल्या तरीसुद्धा ' महिलांचा चौथरा प्रवेश ' या मुद्द्याला कोणीही दुर्लक्षित करता कामानाये.

लहानपणी आम्ही कुटुंब शनिशिंगणापूरला गेलेलं आठवत. दर्शन घेण्यासाठी मला आईने मामासोबत पाठवले. पण आई मागेच थांबली. मी विचारले तर मामा म्हणाले कि इथे पुरुषांनाच प्रवेश आहे. महिलांनी इथे यायचं नसत. तितक्यात आमची दर्षणाची बारी आली.तेव्हा मला जास्त समज नसतानाही विचित्र वाटले आणि आज ते सगळ आठवल तर चीड येते आशा रूढीपरंपरांची. एखादी वस्तू किंवा देव ज्याला फक्त पुरुष स्पर्श करतायत, एखाद्या चौथर्यावर फक्त पुरुषांनाच प्रवेश आहे तर मग महिला त्याला स्पर्श का करू शकत नाहीयेत? तिथे प्रवेश का करू शकत नाहीयेत? का? काय वाटत असेल माझ्या माता-भगिनींना, ' आपण काय पाप केल? आपले काय चुकले? ' कदाचित एखादी चिमुरडी आपल्या आईला विचारत देखील असेल कि, " आई - आई, दादाला आत जाऊ देतायत मग

मला का नाही? " तेव्हा तिची आई नक्कीच तिला मारून तिला पडलेल्या प्रश्नांची गळचेपी करत असणार किंवा तिला सांगत असणार, " ते देवाच असत, आपण गेलो तर देव पाप करेल. " आणि आशीच भीती घालून, प्रश्नांचा जीव घोटून प्रभावित ठेवल्या जातात आशा अनेक रूढीपरंपरा.

एखादी अन्यायकारक परंपरा जेव्हा समाजात अस्तित्वात येते किंवा असते, तेव्हा ती या समाजातील असंख्य साध्याभोळ्या लोकांवर लादली जाते. आणि असंख्य लोक अनिष्ट रूढीपरंपरांचे नाहक बळी बनत जातात. एखादी परंपरा जर राबवली जात असेल, तर जी यंत्रणा ती परंपरा राबवते तिने त्याची कारणे द्यावी. तीसुद्धा तर्कशुद्ध , शास्त्रीय, आणि आजघडीला ती कितपत योग्य आहेत हेदेखील सिध्द करावे.असे करण्यास जर ती यंत्रणा अपयशी ठरत असेल तर ती परंपरा आज कित्येकांना अंध गुलाम बनवतीये हे समजावे. एकेकाळी परंपरा होती कि राजाच्याच पुत्राने पुढचा राजा बनावे. पण हि परंपरा मोडली गेली कारण ती योग्य नव्हती. जेव्हा हि मोडली गेली असेल तेव्हापण नक्कीच भीषण संघर्ष झाला असेल. अखेर बदल आला आणि ती परंपरा मोडण्यात आली. आगदी तसेच आज एखादी चुकीची परंपरा मोडण्यात येतीये तर संघर्ष, विरोध होणारच. आणि आजच्या परंपरेत जो बदल येतोय हा आज नसता झाला तर उद्या झालाच असता.तो आज होतोय हे आपल सुदैवच.

शनीशिंगणापूरला होत असलेल्या घडामोडींवरून त्र्यम्बकेश्वारला निर्णय घेण्यात आला कि मंदिराच्या गाभार्यात महिला आणि पुरुष दोघांनाही बंदी. मग कोणालाही हा प्रशन सहज पडू शकतो कि महिला आणि पुरुष जर गाभार्यात प्रवेश करू शकणार नाही तर मग गाभार्यातील धार्मिक विधीकार्य आणि इतर कार्य कोण करणार? आणि नक्कीच उद्या जर पुरुष व महिलान्व्यतिरिक्त कोणी यांना गाभार्यात प्रवेश करू देण्याची मागणी केली तर त्यांना कोणी आडवले नाही तरच नवल. एकंदरीत बदल हि काळाची नितांत गरज असते. प्रगतीचे दर्शक हे त्या ठिकाणी येणारे सकारात्मक बदल असतात. आपला समाज आनिष्ठ

रूढीपरंपरांचा इतका गुलाम झालाय, या जाळ्यात इतका गुरफटून गेलाय कि त्याला त्याच्या बुद्धीचा देखील विसर पडतोय.आणि जर त्याच्या बुद्धीने प्रश्नांचे दरवाजे ठोठावण्याचा प्रयत्न केलाच तर त्याला समाजाकडून भीतीचे कुलूप लावण्यात येते आणि त्याच्या विचारक्षमतेची चाविदेखील समुद्रात फेकून देण्यात येतिये.

आज झालेल्या संघर्षातून नवीन सकारात्मक बदल उदयाला आलाय. महिलांना चौथर्यावर प्रवेश खुला करून शानिशिन्ग्नापुरात परिवर्तनाची गुडी उभारण्यात आली. या परिवर्तनाच्या विरोधात जी पुरुषमंडळी असतील त्यांना मी नाम्रापुर्वक विनंती करेल कि फक्त एकदा स्वतःला त्या मनात श्रद्धा असूनदेखील मूर्तीला स्पर्श करू न शकणार्या महिलेच्या जागी कल्पना करून बघा. मग तुम्हालापण हे प्रश्न नक्कीच पडतील.आणि एकदाका प्रश्न पडले कि त्यांची उत्तरेपण स्वतःच्या तर्कशुद्ध बुद्धीने सापडण्याचा प्रयत्न करावा. आणि जर उत्तरे समाधानकारक मिळाली नाहीत तर समजावे कि या यंत्रणेत काहीतरी चुकीचं आणि मग ती चूक कायमची काढून टाकावि.

शनिमंदिरात लाख्खो लिटर तेल वाहिले जाते. आता हीदेखील परंपरा किंवा अंधश्रद्धा म्हणता येईल. परंतु या गोष्टीला अधोरेखित करून का थांबवू नये? पण या लख्खो लिटर तेलाच्या दानाचा फायदा जर गोरगरिबांना होत असेल, यातून उभारणाऱ्या निधीतून काहीतरी चांगल कार्य घडत असेल तर याला अडवण्याचे कारण नाही. पण जर एखाद्या गैरपरंपरेमुळे माझ्या लाख्खो माताभगीनिन्च्या भावना दुखावणार असतील तर मी त्या परंपरेवर नक्कीच आक्षेप घ्यायला मागे हटणार नाही.

Pavan Ravindra Shinde



# पवन शिंदे आणि शुभम कथले ‘ब्लॉग बेंचर्स’चे विजेते

प्रतिनिधी, मुंबई

'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल'चे सरचिटणीस सलील शेट्टी यांनी भारतातील परिस्थितीवर केलेले भाष्य गंभीर आणि तितकेच चिंतनीय आहे. व्यवसायविस्ताराच्या मोहापायी जगाने चीन आणि भारतातील मानवी हक्कांच्या पायमल्लीकडे सातत्याने दुर्लक्ष केले. परंतु हे आर्थिक आकर्षण आता पूर्वीइतके राहिलेले नाही. हे वास्तव आहे. आणि ते महत्त्वाचे अशासाठी ठरते की त्यामुळे भारतातील असहिष्णू वर्तमानाची अधिकाधिक चिकित्सा आता जागतिक पातळीवर होऊ लागली असून भारतासाठी ते अडचणीचे ठरणारे आहे. या संदर्भात ते संयुक्त राष्ट्राच्या जिनिव्हा येथील परिषदेचा दाखला देतात. भारतातील वास्तवाची कठोर चिकित्सा व्हायला हवी, हा मतप्रवाह जगात सुदृढ होत असल्याचे त्यांचे मत म्हणूनच महत्त्वाचे. त्याची दखल सत्ताधारी घेतील, ही आशा. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचा २०१६चा वार्षिक अहवाल जग हे कसे बंदिशाळा होऊ घातले आहे, ते दाखवून देतो. या बंदिशाळेत भारताचाही समावेश होणे हे



आपणास खचितच भूषणावह नाही, असे मत ‘जग हे ‘बंदी’शाळा...’ या अग्रलेखात मांडण्यात आले आहे. या अग्रलेखावर आपली भूमिका मांडत लातूरमधील एमआयडीएसएल दंतवैद्यकीय महाविद्यालयाचा विद्यार्थी पवन शिंदे हा ‘ब्लॉग बेंचर्स’च्या पहिल्या पारितोषिकाचा मानकरी ठरला आहे. या स्पर्धेत पुण्यातील गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाचा विद्यार्थी शुभम कथले याने दुसरे पारितोषिक पटकावले.

अग्रलेखावर मत मांडणाऱ्या पवन आणि शुभम यांनी दर्जेदार लेखन करीत ‘ब्लॉग बेंचर्स’ स्पर्धेत बाजी मारली. पवनला सात हजार आणि प्रमाणपत्र तर शुभमला पाच हजार रुपये आणि प्रमाणपत्र असे बक्षीस देण्यात येणार आहे.

## पारितोषिक रोखले

मागच्या आठवड्यात जाहीर झालेल्या ‘लांडगे आणि कोल्हे’ या अग्रलेखावरील विजेत्यांमध्ये सत्यजित पुष्पा एकनाथ या विद्यार्थ्याने प्रथम पारितोषिक पटकविल्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर त्याचे लिखाण वाङ्मय चौर्याचा प्रकार असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे सत्यजितला जाहीर करण्यात आलेले प्रथम पारितोषिक मागे घेण्यात येत आहे. सत्यजितच्या नावाने प्रसिद्ध झालेला ब्लॉग हा विमा व कर सल्लागार व्यावसायिक प्रसाद भागवत यांचा आहे

**News in Local news Paper**



# ‘गुणवंतांचे प्रावीण्य समाजोपयोगी पडावे’

लोकसत्ता ‘ब्लॉग बेंचर्स’चा सन्मान

वार्ताहर, बीड

शिक्षणक्षेत्रात कोणाचीही मक्तेदारी राहिली नसून प्रत्येकजण आपल्या बुद्धिकौशल्याच्या बळावर गुणवंत ठरू लागला आहे. दलित, पददलित, ओबीसी विद्यार्थी विद्येच्या प्रतिभेवर आव्हाने पेलत आहेत. गुणवंतांचे प्रावीण्य समाजाच्याही उपयोगी पडावे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ उपनेते आमदार जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

लोकसत्ता ब्लॉग बेंचर्स स्पर्धेतील प्रथम विजेता पवन शिंदे याचा क्षीरसागर यांच्या हस्ते गुरुवारी सन्मान करण्यात आला. जय संताजी प्रतिष्ठानच्या वतीने तेली समाजातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळा आमदार क्षीरसागर यांच्या उपस्थितीत झाला. डॉ. योगेश क्षीरसागर, राजेंद्र पवार, पांडुरंग क्षीरसागर, पुष्पा पांगारकर, सुरेश क्षीरसागर, दशरथ गोरे, राम पवार, शिवाजी बरकसे, रामेश्वर पवार आदींची या वेळी उपस्थिती होती. आमदार क्षीरसागर म्हणाले की, दहावी-बारावीतील गुणवंतांनी मेडिकल, इंजिनिअरींगशिवाय इतरक्षेत्रांतही उपलब्ध असलेल्या संधीचे सोने करणे आवश्यक आहे. शिक्षणक्षेत्रात कोणत्याही एका समूहाची मक्तेदारी राहिली नसून प्रत्येकजण आपल्या बुद्धिकौशल्याच्या बळावर गुणवंत ठरू लागला आहे. स्पर्धेच्या युगात प्रत्येक विद्यार्थ्याने पुढे येणाऱ्या आव्हानांना तोंड देत त्यावर मात करणे आवश्यक आहे. दहावी-बारावीसह मेडिकल आणि इंजिनिअरींग क्षेत्रात गुणवंत ठरलेल्या तेली समाजातील दीडशे विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते या वेळी गौरव करण्यात आला.

लोकसत्ता ब्लॉग बेंचर्सचा विजेता पवन शिंदे याचा तेली समाजातील गुणवंत विद्यार्थी सोहळ्यात आमदार जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**News in Local news Paper**

# MIDSR Dental College & Hospital
# And Research Center, Latur.

****************************************

## STUDENT ACHIEVMENTS:

Dr. SujitZadke,PG student of Department of orthodontics and dentofacial orthopaedics got first prize in singing at 22 nd IOS PG Students Convention.





22nd IOS PG STUDENTS CONVENTION

Host : Department of Orthodontics and Dentofacial Orthopaedics,
D Y Patil (Deemed to be University) School of Dentistry

Certificate of Appreciation

Awarded to

ZADAKE SUJIT MANMATH.

had won Ist place in the

solo-singing.

competition

held during the 22nd IOS Post Graduate Students Convention 2018
at D Y PATIL (Deemed to be University) School of Dentistry, Navi Mumbai
on 17th February 2018 at Navi Mumbai.

| Dr. Shailesh Deshmukh | Dr. C. Deepak | Dr. Vivek P. Soni | Dr. Nitin Gadhiya |
|---|---|---|---|
| President | Hon. Secretary | Organising Chairman | Organising Secretary |
| Indian Orthodontic Society | Indian Orthodontic Society | 22nd IOS PG Student Convention | 22nd IOS PG Student Convention |

Dr. Sujit Zadke Certificate- Singing competition at 22 nd IOS PG Students Convention.

# MIDSR Dental College & Hospital
# And Research Center, Latur.

****************************************




Dr. Jayshri Bhangare Certificate- won second place in the mock song at 22 nd IOS PG Students Convention.